# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यातील अनुसूचित जातीचे विदयार्थ्यांचे शिष्यवृत्तीबाबत

**(१) २८६१७ (२३-१२-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जातीचे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नयेत यासाठी काळजी घेतली जावी अशी सूचना राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे मा. अध्यक्ष यांनी केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती नाकारली जाऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केले वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त विद्यार्थ्यांसाठी अद्याप पर्यंत किती वसतिगृह उभारण्यात आले आहेत व त्यांची क्षमता किती आहे व किती वसतिगृह उभारण्याची मागणी आहे,

(४) असल्यास, अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांसाठी अधिक वसतिगृह उभी करण्यासंदर्भात शासन विचाराधीन आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-०७-२०१७) :** (१) होय.

(२) अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिष्यवृत्ती योजना ऑनलाईन करण्यात आलेली असून प्रथम वर्षामध्ये विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर द्वितीय वर्षापासून पुन्हा अर्ज भरण्या ऐवजी अर्जाचे नुतनीकरण करण्याच्या सूचना महाविद्यालयांना देण्यात आलेल्या आहेत. तसेच लाभार्थी विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नये म्हणून विशेष मोहिमेअंतर्गत महाविद्यालयांच्या साप्ताहिक बैठका घेऊन महाविद्यालयांना तात्काळ त्यांचे स्तरावरील प्रलंबित अर्ज जिल्हयातील समाजकल्याण कार्यालयास फॉरवर्ड करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) राज्यात सद्य:स्थित एकूण ३८१ शासकीय वसतिगृह कार्यरत आहेत. त्यापैकी २११ मुलांची आणि १६३ मुलींची वसतिगृहे असून तेथील प्रवेश क्षमता ३२३४९ इतकी आहे. राज्य स्तरावर प्रत्येक तालुक्यात एक मुलांचे व एक मुलींचे शासकीय वसतिगृह उभारण्यासाठी बृहत आराखडा तयार करणेत येत आहे.

(४) राज्यात आणखी मुलींसाठी ५० नवीन शासकीय वसतिगृह उभारण्यासाठी शासनाने मान्यता दिलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील दिडशे वैद्यकिय महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना राज्याच्या सामाजिक न्याय विभागामार्फत शिष्यवृत्ती देण्याबाबत**

**(२) ३४३०२ (२३-१२-२०१५). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिडशे वैद्यकिय महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना राज्याच्या सामाजिक न्याय विभागामार्फत शिष्यवृत्ती देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी राज्यातील सर्व वैद्यकिय महाविद्यालये अद्यायावत माहिती महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडे सादर करण्याच्या सूचना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ व राज्याच्या सामाजिक न्याय विभागाने वेळोवेळी दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील वैद्यकिय महाविद्यालयाने शिष्यवृत्ती संदर्भात माहिती अद्यापही उपलब्ध करुन दिली नसल्याने महागाडे वैद्यकीय शिक्षण घेणारे हजारो विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकारास जबाबदार असलेल्या संबंधित वैद्यकि महाविद्यलयांवर राज्य शासनाने कोणती कारवाई केली आहे व करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-०७-२०१७) :** (१) केंद्र शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार विहित केलेल्या अभ्यासक्रमास आणि विहित केलेल्या उत्पन्न मर्यादेच्या अटीच्या अधीन राहून शासन मान्यता प्राप्त संस्थेतील व्यावसायिक / अव्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.

(२) होय.

(३) नाही,

वैद्यकीय महाविद्यालयातील मागासवर्गीय पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती संदर्भातील महाविद्यालय स्तरावरील आणि जिल्हा स्तरावरील प्रलंबित अर्ज तात्काळ निकाली काढण्याबाबत संबंधिताना सूचना दिलेल्या असून पात्र लाभार्थी लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मागासवर्गीय समाजातील ४० टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या सर्वच व्यक्तींना सामाजिक न्याय विभागामार्फत मोफत घरे देण्याबाबत**

**(३) ४१६३१ (२८-०४-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागासवर्गीय समाजातील ४० टक्क्यापेंक्षा जास्त अपंगत्व असलेल्या सर्वच व्यक्तींना सामाजिक न्याय विभागामार्फत मोफत घरे देण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे प्रतिपादन मा. सामाजिक न्याय मंत्री यांनी सांगली येथे दिनांक २८ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास सांगितल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रस्तावाची थोडक्यात रुपरेषा काय आहे,
(३) असल्यास, शासनाने या प्रस्तावास मान्यता दिली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०१-०७-२०१७) :** (१) नाही.
(२) व (३) अनुसूचित जातीतील दारिद्र्य रेषेखाली नसलेल्या ४०% पेक्षा जास्त अपंगत्व व उत्पन्न एक लाखापेक्षा अधिक असलेल्या आणि योजनेच्या अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या अपंग लाभार्थ्यास रमाई आवास घरकुल योजनेचा लाभ देण्याचा निर्णय दि. ३१/१२/२०१५ च्या आदेशान्वये घेण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मागासवर्गीय मुलांसाठी देण्यात येणाऱ्या शासकिय वसतिगृहातून लातूरला वगळलेबाबत**

**(४) ४२०९६ (२८-०४-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त राज्य सरकारच्या सामाजिक न्याय विभागाने विभाग, जिल्हा व तालुका पातळीवर मागासवर्गीय मुलांसाठी नवीन पन्नास शासकीय वसतीगृह सुरु करण्याचा निर्णय स्वागतार्ह असला तरी त्यातून लातूर विभागाला वगळल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये व त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लातूर विभागात वसतिगृह प्रवेशासाठी मागासवर्गीय मुलांची प्रतीक्षायादी मोठी असताना विभागपातळीवरील वसतिगृहासाठी लातूरला वगळल्याने नाराजी व्यक्त होत असून विभागपातळीवर लातूर विभागाला वसतिगृह मिळणे बाबत राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, या मागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०१-०७-२०१७)** :(१) नाही.

(२) शासन निर्णय दि.१६/१२/२०१५ अन्वये लातूर जिल्ह्यात तालुका स्तरावर १०० क्षमतेचे मागासवर्गीय मुलींचे ०३ व विभागात एकूण ०६ वसतीगृह सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त आयोजित केलेल्या विविध योजनाबाबत**

**(५) ४२६३४ (२८-०४-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त शासनाने हे वर्ष सामाजिक न्याय वर्ष म्हणून साजरे करण्याचे घोषित केले असताना सामाजिक न्याय विभागाकडून मात्र त्याउलट निर्णय घेतले जात असल्याचे डिसेंबर २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शासकीय वसतीगृहामधील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना भोजन पुरविण्यासाठी दिल्या जाणाऱ्या कंत्राट प्रक्रियेतून अनुसूचित जातींच्या संस्था व महिला बचत गटांना बाद करण्याचा घाट घातला असून २० ते ३० लाख रुपयापर्यंत आगाऊ रक्कमा भरण्याची अट घातल्यामुळे या संस्था निविदा प्रक्रियेत टिकू शकणार नाहीत अशी व्यवस्था करण्यात आल्याची या संस्थांकडून शासनाकडे तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात ३८१ शासकीय, वसतीगृहातून सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणांसाठी गुणवत्तेवर आधारित प्रवेश दिला जात असून या वसतीगृहामध्ये असलेल्या सुमारे ४० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना उत्तम प्रतिचे भोजन पुरविण्यासाठी खाजगी संस्थांना ठेकेदेण्याचा सामाजिक न्यायविभागाने जुलै, २०११ रोजी निर्णय घेतला असून त्यासंदर्भात काढण्यात आलेल्या आदेशात संविधानातील अनुच्छेद ४६ चा आधार घेवून अनुसुचित जातीच्या कल्याणासाठी निधीचा वापर करावयाचा असल्यामुळे भोजनाचे ठेके देताना अनुसुचित जातीच्या सहकारी संस्था इतर संस्था व महिला बचत गटांना प्राधान्य देण्यात यावे, असे म्हटले असून त्यानुसार सुमारे २० संस्था भोजन पुरवठा करण्याचे कार्य करित होत्या, हे ही खरे आहे काय,

(४) सामाजिक न्याय विभागाच्या समाज कल्याण आयुक्तालयाने २०१५-२०१६ या वर्षासाठी जिल्हानिहाय भोजनाचे ठेकेदेण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरु केली आहे मात्र निविदाच्या अर्जाच्या किंमती तसे आगाऊ रक्कमा भरण्याची अट २० ते ३० लाखांपर्यंत घातल्यामुळे या संस्था निविदा स्पर्धेत टिकू शकणार नाहीत, हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, आतापर्यंत कार्यरत असलेल्या अनुसुचित जातीच्या सहकारी संस्था, इतर संस्था व महिला बचत गट यांच्यावर कोणत्याही प्रकारे भोजन पुरविण्याच्या संदर्भात समस्या निर्माण होवू नये व त्यांनाही न्याय देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे?

**श्री. राजकुमार बडोले (०४-०७-२०१७) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) नाही, हे खरे नाही. सुधारीत बयाना रक्कम रु. १.०० लाख एवढी निर्धारीत केलेली आहे. त्यामुळे निविदा स्पर्धेत मागासवर्गीय संस्था टिकू शकणार नाहीत, हे खरे नाही.
(५) सदर प्रकरणात मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून न्याय देण्याच्या दृष्टीने शासनाकडून उपाययोजना करण्याचे नियोजन आहे.

---

### राज्यातील सर्व सहायक समाजकल्याण आयुक्तांनी सन २०११-१२ पासून सन २०१४-१५ पर्यंत देय नसलेल्या अभ्यासक्रमांना नियमबाहय रित्या दोनशे कोटी निधीची शिष्यवृत्ती वितरीत केल्याबाबत

**(६) ४६४१८ (२८-०४-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व सहायक समाजकल्याण आयुक्तांनी सन २०११-१२ पासून सन २०१४-१५ पर्यंत देय नसलेल्या अभ्यासक्रमांना नियमबाहय रित्या दोनशे कोटी निधीची शिष्यवृत्ती वितरीत केल्याची धक्कादायक बाब माहे डिसेंबर, २०१५ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशी अंती कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय,

**श्री. राजकुमार बडोले (०३-०७-२०१७) :**(१) नाही, तथापि याबाबत (SIT) विशेष चौकशी पथकामार्फत चौकशी करण्यात येत आहे.
(२) व (३) (SIT) विशेष चौकशी पथकामार्फत (SIT) चौकशी  सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात स्थायिक झालेल्या पद्मशाली समाजास जातीच्या दाखल्यासाठी असलेल्या पुराव्याच्या वर्षाच्या मर्यादेबाबत

**(७) ४६७८६ (२८-०४-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पद्मशाली समाज आंध्रप्रदेशातून विस्थापीत होऊन राज्यात स्थानिक झाला आहे त्यामुळे त्यांना जातीच्या दाखल्यासाठी १९६७ च्या पूर्वीच्या जातीचा उल्लेख असलेली कागदपत्रे शासनास सादर करणे अशक्य होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १६ मार्च, २०१३ नुसार वेतन व शेतीपासून मिळणारे उत्पन्न वगळून इतर मार्गाने होणारे उत्पन्न रुपये ६ लाख मर्यादीत नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न १ नुसार सदर जातीच्या दाखल्यासाठी असलेली पुराव्याच्या वर्षाच्या मर्यादेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रश्न २ नुसार नॉन क्रिमिलेअरसाठी असलेली उत्पन्न मर्यादेत वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२९-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्याच्या मागासवर्गीय यादीमध्ये ज्या जातींचा समावेश आहे, केवळ त्याच जातीतील समाजाच्या लोकांना मागासवर्गीयांचे जातप्रमाणपत्र देण्यात येते. सदर यादीतील विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गात अ.क्र.३ मधील क्र.९ वर पद्मशाली या जाती समाजाचा समावेश आहे. जातपडताळणी नियम-२०१२ नुसार आवश्यक ती कागदपत्रे, पुरावे सादर केल्यास त्यांना जातप्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र मिळण्यास कोणतीही अडचण उभ्दवत नाही. सदर नियामांनुसार विशेष मागास प्रवर्गातील व्यक्तींना अथवा त्यांच्या कुटुंबियांना, दि.१३/१०/१९६७ रोजी वा तत्पूर्वी यांचा राज्यातील सर्वसाधारण रहिवास असण्याची अट विहित करण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) मा.सवोच्च न्यायलयाचे निर्देश, तसेच सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ नुसार जातपडताळणी नियम २०१२ विहित करण्यात आले आहेत. या नियमांनुसार जातप्रमाणपत्र देणे व त्याच्या पडताळणीचे कामकाज चालते. जातपडताळणी नियम-२०१२ नुसारच विशेष मागास प्रवर्गाकरिता राज्यतील सर्वसाधारण रहिवासाची अट विहित करण्यात आली आहे.

तथापि, या विभागाच्या दि.१/४/२०१६ च्या शासन निर्णयान्वये जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याची कार्यपध्दती सुलभ करण्यासाठी मा.सामाजिक न्याय मंत्री यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे.

(४) या विभागाच्या दि.२४/६/२०१३ अन्वये क्रिमीलेअरसाठी असलेल्या उत्तपन्न मार्यादेत रु.४.५० वरुन ६.०० लाख इतकी वाढ करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उभ्दवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील विविध प्रवर्गातील मागासवर्गीय विद्यार्थीना शिष्यवृत्तीचे ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी तांत्रिक अडचणी असल्याबाबत**

**(८) ४८०६९ (२६-०५-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील इयत्ता अकरावी ते पदव्युत्तरापर्यंत शिक्षण घेणाऱ्या विविध प्रवर्गातील मागासवर्गीय विद्यार्थीना शिष्यवृत्तीचे ऑनलाईन अर्ज भरण्यास तांत्रिक अडचणी आल्याने सुमारे दोन लाख विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती अडचणीत आल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले ,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. राजकुमार बडोले (०३-०७-२०१७) :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनुसूचित जाती/जमातीतील विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती सुरु करण्याऐवजी परदेशवारी घडवून आणल्याबाबत**

**(९) ५०८७४ (२८-०४-२०१६). ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामाजिक न्याय मंत्रालयाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर रौप्यमहोत्सव जयंती वर्षानिमित्त अनुसूचित जाती/जमातीतील व इतर मागासवर्गातील विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती सुरु करण्याऐवजी अलिकडेचे अर्थात माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान २५-२५ विद्यार्थ्यांचे दोन गट या योजनेंतर्गत कोलंबिया व लंडनची लाखो रुपये खर्च करुन परदेशवारी घडवून आणल्याची धक्कादायक बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीवर्षानिमित्त दरवर्षी १२५ दलित विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्तीची शिफारस सामाजिक न्याय मंत्रालयाला करुनही तिचा विचार करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परदेशवारीला गेलेल्या विद्यार्थ्यांच्या गटात विद्यार्थी संघटना, राजकीय पक्षांशी लागेबांधे असलेल्या विद्यार्थ्यांनाच प्राधान्य देण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्नोक्त भाग १, २ व ३ प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा प्रस्तावति आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-०७-२०१७) :**(१) नाही.
(२) व (३) नाही.

राज्य शासनाने सन २००३ मध्ये अनुसूचित जातीच्या मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणाकरीता शिष्यवृत्ती योजना सुरु केली असून अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशातील क्यूएस अद्ययावत वर्ल्ड रॅन्कींग मध्ये ३०० च्या आत असलेल्या शैक्षणिक संस्था/विद्यापीठामध्ये प्रवेश मिळालेल्या व निवड समितीमार्फत निवड झालेल्या पात्र ५० विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती देण्यात येते.

राज्य शासनाने सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षासाठी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजनेंतर्गत असलेल्या ५० विद्यार्थ्यांच्या संख्यात वाढ करुन ही संख्या ७५ एवढी केली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) येथील मुक्तीभुमी स्मारक परिसरात विविध सुविधा पुरविणेबाबत**

**(१०) ५४५३३ (२०-०८-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (जि.नाशिक) येथील मुक्तीभुमी स्मारक परिसरात प्रशिक्षण केंद्र, ग्रंथालय/वाचनालय, अतिथी निवासस्थान बांधणे इ. सुविधा पुरविण्याच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी मिळणेसाठी बार्टी पुणे यांनी माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणेसाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. राजकुमार बडोले (०१-०७-२०१७) :** (१) होय.

(२) सदर प्रस्तावावर शासनस्तरावर योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**इंदापूर (जि.पुणे) तालुक्यातील रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्टमध्ये विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित ठेवलेबाबत**

**(११) ५५५३१ (२०-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्टमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित ठेवले असल्याचे दिनांक ५ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाण्याचा टँकर दिला नसल्याने विद्यार्थ्यांनी (पंचायत समिती कार्यालय, तहसील कार्यालय नागरी सुविधा केंद्राच्या प्रांगणात) शासकीय कार्यालयाच्या आवारात वार्षिक परिक्षा देण्याचे आंदोलन सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत टँकर देण्याचे आश्वासन देऊनही तो न दिल्याने तहसीलदार व गटविकास अधिकारी यांच्यावर कारवाई करुन त्यांना निलंबित करण्याची मागणी आंदोलनाद्वारे विद्यार्थ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी दोषींवर शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-०७-२०१७) :**(१) नाही, हे खरे नाही.

पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृहामध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना दि. १ एप्रिल, २०१६ पासून पाण्याची एक खेप टँकरद्वारे दिली जात होती.

(२) होय, हे खरे आहे.

सदर वसतिगृहास टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याची एक खेप दिली जात होती. तथापि, विद्यार्थ्यांची मागणी २ खेपांची होती. यास्तव, तहसील कार्यालय व पंचायत समिती कार्यालयाच्या आवारात विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात येईल, या विषयाचे पत्र अध्यक्ष, रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्ट यांनी दि. ०१/०४/२०१६ रोजी दिलेले होते.

(३) होय, हे खरे आहे.

तहसीलदार व गटविकास अधिकारी यांच्यावर ॲट्रॉसिटी व इतर आय. पी. सी. कलमान्वये गुन्हा दाखल करून अटक करण्याबाबत अध्यक्ष, रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्ट यांनी पोलीस निरीक्षक, इंदापूर पोलीस स्टेशन यांना दि. ०५/०४/२०१६ रोजी पत्र दिले आहे.

(४) विद्यार्थ्यांनी केलेल्या मागणीनुसार वसतिगृहातील विद्यार्थ्यांना दि. ८/४/२०१६ पासून पाण्याच्या टँकरच्या दोन खेपा देण्यात आल्या आहेत. यामुळे, कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्र सरकारने मागास विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची आर्थिक मर्यादा वाढ केली नसल्याबाबत**

**(१२) ५५८४९ (२०-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारने मागास विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची आर्थिक मर्यादा २ लाखांवरुन ५ लाख रुपये न केल्यामुळे गेल्या चार वर्षापासून लाखो विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला नसल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मागासवर्गीयांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,

(३) असल्यास,सद्य:स्थितीत किती मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्सवृत्तीचा लाभ मिळाला आहे व किती विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिले आहेत,

(४) याबाबत शासनाची भूमिका काय आहे?

**श्री. राजकुमार बडोले (०३-०७-२०१७) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) राज्यातील समाज कल्याण विभागामार्फत मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीच्या लाभासाठी शैक्षणिक वर्ष सन २०१५-१६ मध्ये विजाभज, इमाव व विमाप्र या प्रवर्गामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून एकूण १६,८३,७८४ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती ऑनलाईन अर्ज केले होते. त्यापैकी १३,४९,४५५ विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात आले. उर्वरित अर्जांपैकी महाविद्यालयीन स्तरावर १,६७,७२४ व जिल्हास्तरावरील १,५४,४०६ अर्ज प्रलंबित आहेत. त्यासाठी आवश्यक असणारी आर्थिक तरतूद सर्व विभागाना उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच विशेष मोहिमेअंतर्गत महाविद्यालयांच्या साप्ताहिक बैठका घेऊन महाविद्यालयांना तात्काळ त्यांचे स्तरावरील प्रलंबित अर्ज निकाली काढण्याबाबत संबंधिताना सूचना दिलेल्या असून पात्र लाभार्थी लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.

---

**अनुसूचित जाती-जमाती व महिला उद्योजकांसाठी 'स्टॅण्ड अप इंडिया' योजना सुरू करण्याबाबत**

**(१३) ५५९९६ (२०-०८-२०१६). अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त अनुसूचित जाती-जमाती व महिला उद्योजकांना उत्तेजन देऊन त्यांना स्वयंपूर्ण व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्याच्या उद्देशाने 'स्टॅण्ड अप इंडिया' योजना सदर केली असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेतून राज्यात २० हजार अनु.जमाती व महिला उद्योजक तयार करण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना राज्यात आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०६-०७-२०१७) :** (१) केंद्र शासनामार्फत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त अनुसूचित जाती, जमाती व महिला उद्योजकांना उत्तेजन देऊन त्यांना स्वयंपूर्ण व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्याच्या उद्देशाने "स्टॅण्ड अप इंडिया योजना" आखण्यात आली असून त्याद्वारे प्रत्येक बँकेकडून अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील किमान एका उद्योजकास व एका महिला उद्योजकाला रु.१० लाख ते रु. १ कोटीपर्यंत कर्ज सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते.

(२) प्रस्तुत बाब केंद्र शासनाशी निगडीत असल्याने निश्चित लाभार्थी सांगणे शक्य नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात मागासवींय संवर्गातील एकदा जात पडताळणी झालेल्या व्यक्तींच्या रक्ताच्या नात्यातील व्यक्तीला नव्याने जात पडताळणी करण्याची गरज नसल्याबाबत**

**(१४) ५६१८३ (२०-०८-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागासवींय संवर्गातील एकदा जात पडताळणी झालेल्या व्यक्तींच्या पाल्यांना म्हणजे रक्ताच्या नात्यातील व्यक्तीला नव्याने जात पडताळणी करण्याची गरज नसल्याच्या प्रस्तावास दिनांक २७ मे, २०१६ रोजी मंत्रीमंडळाने मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे, त्यावर कोणता निर्णय घेतला व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच राज्यातील मागासवर्गीय संवर्गातील जात पडताळणीमध्ये येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी लवकर निर्णय घेऊन आवश्यक उपाययोजना करण्यासंदर्भात कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,?

**श्री. राजकुमार बडोले (२९-०६-२०१७) :** (१) यासंदर्भात नियमातील तरतूदी तपासून कार्यवाही करण्याबाबत निदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार जातपडताळणी अधिनियम २००० व जातपडताळणी नियम २०१२ मधील तरतूदी तपासण्याची कार्यवाही चालु आहे.
(२) प्रश्न उभ्दवत नाही.
(३) जापडताळणी - नियम २०१२ नुसार जातपडताळणी समितीस जातवैधतेबाबतचा निर्णय ३ महिन्याच्या अवधीत व अपवादात्मक परिस्थितीत २ महिन्याच्या जास्तीच्या कालावधीत देणे बंधनकारक आहे. तसेच दि.२/३/२०१५ च्या शासन निर्णयान्वये प्रत्येक जिल्हयासाठी स्वतंत्र जिल्हानिहाय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती स्थापन करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अभियांत्रिकी महाविद्यालयांमधील प्राध्यपकांचे वेतन थकीत असल्याबाबत**

**(१५) ५८९२५ (२०-०८-२०१६). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १२ अभियांत्रिकी महाविद्यालयातील व आणखी काही महाविद्यालयातील शेकडो प्राध्यापक/अध्यापक व कर्मचाऱ्यांना ६ते ८ महिने वेतन मिळत नसल्याच्या तक्रारी शासनाकडे आल्या आहेत. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शुल्क प्रतिपूर्ती करण्याच्या धोरणानुसार समाज कल्याण विभागाकडून संबंधीत महाविद्यालयांना पैसेच दिले जात नसल्याने आपल्याला वेतन देण्यात अडचणी येतात असे शिक्षण संस्था चालकानी शासनाला कळविले हे खरे आहे काय,
(३) असल्यास, समाज कल्याण विभागाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शुल्क प्रतिपूर्ती ची रक्कम गेली काही वर्षे अदा केलेली नाही हे खरे आहे काय,
(४) असल्यास,समाज कल्याण विभागाकडून मागासवर्गिय विद्यार्थ्यांची शुल्क प्रतिपूर्तीस विलंब करण्याची काय कारणे आहेत,

**श्री. राजकुमार बडोले (०३-०७-२०१७) :**(१) नाही.
(२) नाही.

(३) नाही.

(४) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शिक्षण फी परीक्षा फी प्रतिपूर्ती योजनेचा लाभ विलंबाने मिळण्याबाबत प्रामुख्याने पुढीप्रमाणे कारणे दिसून येत आहेत, शिक्षण शुल्क समितीने विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित व्यावसायिक महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमाचे शुल्क अंतिम केलेले नसणे, शिक्षण शुल्क समितीकडून प्रतिवर्षी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालयांना वाढीव शुल्क शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी मंजूर न करणे, प्रत्येक वर्षी साधारणत: डिसेंबर ते मार्च महिन्यात महाविद्यालयाकडून शिक्षण शुल्क वाढीसाठी प्राप्त झालेले प्रस्ताव निकाली काढण्यात येतात. सदरचे वाढीव शुल्क, शिक्षण शुल्क समितीकडून मंजूर केले जात नाही. त्यामुळे महाविद्यालये विद्यार्थ्यांचे अर्ज लवकर फॉरवर्ड करीत नाहीत त्यामुळे समाजकल्याण कार्यालयाकडे उशिरा सादर करण्यात येतात. शिवाय सन २०१५-१६ करीता शिष्यवृत्ती संदर्भातील ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत दिनांक ३१ मार्च, २०१६ पर्यंत वाढविण्यात आलेले होती इ. कारणांमुळे विलंब झालेला आहे. अशी बाब असली तरी मागासवर्गीय पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती संदर्भातील महाविद्यालयस्तरावरील आणि जिल्हा स्तरावरील प्रलंबित अर्ज तात्काळ निकाली काढण्याबाबत संबंधिताना सूचना दिलेल्या असून पात्र लाभार्थी लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.

---

**केंद्र सरकारी सेवेतील नोकऱ्या व शिक्षण संस्थामधील प्रदेशाच्या सवलती धर्मांतर केलेल्या नवबौद्धांना नाकारलेबाबत**

**(१६) ६०९०९ (२०-०८-२०१६). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारी सेवेतील नोकऱ्या व शिक्षण संस्थामधील प्रवेशाच्या सवलती अनुसूचित जातीमधून धर्मांतर केलेल्या नवबौद्धांना देण्यास केंद्र सरकारने नकार दिल्याची बाब राज्याचे केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री थावरचंद गेहलोत व राज्याचे सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले यांच्यातील पत्रव्यवहारातून माहे जून, २०१६ मध्ये वा पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रातील आरक्षणासाठी बौद्धानाही महार, मांग, चांभार ई. पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य जातीचे दाखले देणे बंधनकारक राहणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (२२-०६-२०१७) :**(१), (२) व (३) केंद्र शासनाने अनुसूचित जातीसाठी निर्धारित केलेल्या जातप्रमाणपत्राच्या नमुन्यात अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र असल्यास केंद्र शासनाच्या सेवेतील नोकऱ्या व शिक्षण संस्थामधील प्रवेशातील सवलती मिळण्यास संबंधितांना कोणतीही अडचण येत नाही.

दिनांक १ सप्टेंबर, २०१२ रोजी पारित केलेल्या जातपडताळणी नियमांनुसार अनुसूचित जातीत धर्मांतरीत बौध्द/नवबौध्द व्यक्तींसाठी प्रमाणपत्राचा नमुना क्र.५(६) ७ निश्चित केलेला असून त्या विहित नमुन्यात प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे. अशा व्यक्तींना राज्य शासकीय सेवा, शैक्षणिक तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडणूक यासाठी असलेले आरक्षणाचे लाभ मिळण्यासाठी कोणत्याही अडचणी येत नाहीत. अनुसूचित जातीतील धर्मांतरीत व्यक्तींसाठी स्वतंत्र प्रमाणपत्राचा नमुना केंद्र शासनाने निश्चित केलेला नाही.

केंद्र शासनाने घटना (अनु. जाती) आदेश (सुधारणा) कायदा १९९० दि.३/६/१९९० अन्वये घटना (अनु.जाती) १९५० मध्ये सुधारणा केल्यानुसार अनुसूचित जातीमधून बौध्द धर्मात धर्मांतरीताना राज्य तसेच केंद्र शासनाच्या घटनात्मक आरक्षण व इतर सवलती अनुज्ञेय आहेत. अशी तरतूद शासन निर्णय दि.८ नोव्हेंबर, १९९० मध्ये केलेली आहे. त्यानुसार जात प्रमाणपत्राचा नमुना सुधारित करण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सामाजिक न्याय खात्यातील अधिका-यांच्या दूर्लक्षामुळे तब्बल १६०० कोटी रुपये अनूसूचित जातींसाठी खर्च न केल्याने वाया गेल्याबाबत**

**(१७) ६२०६४ (२०-०८-२०१६). श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या अर्थसंकल्पात अनूसूचित जातीच्या घटकांसाठी ११ हजार कोटी रुपयांची तरतूद सामाजिक न्याय खात्याकरिता केलेली असताना, या खात्यातील अधिका-यांच्या हलगर्जीपणामुळे तब्बल १६०० कोटी रुपये अनूसूचित जातींसाठी खर्चच न करण्यात आल्यामुळे ही रक्कम वाया गेल्याचे नुकतेच माहे जून ,२०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच अनूसूचित जातींच्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठीच्या ७०० कोटीच्या निधीचे वितरणही केले गेले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याच्या अर्थसंकल्पात अनुसूचित जाती आणि जमातीसाठी भरीव निधीची तरतुद केली जात असून सदरहू निधी अनूसुचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी आश्रमशाळांचे अनुदान, वसतिगृह, अपंगांच्या संस्था आदी कामांसाठी वापरण्याचे बंधनकारक असतांनाही निधी खर्च न करण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, अनूसूचित जाती आणि जमातीच्या घटकांतील विद्यार्थ्यांवर अन्याय होत असून याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसलयास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (०१-०७-२०१७) :**(१) राज्याच्या अर्थसंकल्पात अनुसूचित घटकांसाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी रु. ४५२८.८८ कोटी एवढा निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला होता. सदर निधीपैकी रु. ३१५४.९० कोटी एवढा निधी खर्च करण्यात आला. उर्वरित रु. १२३०.१८ कोटी इतका निधी काही तांत्रिक बाबीमुळे अखर्चित राहिलेला आहे. तसेच दि. ३१ मार्च, २०१६ रोजी विविध विभागामार्फत निधी वितरणाची कारवाई करण्यात येत असल्याचे अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर अतिरिक्त ताण होता त्यामुळे निधी वितरणांस अडचणी निर्माण झाल्या.

(२) सन २०१५-१६ मध्ये विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, शिक्षण फी व परिक्षा फी प्रतिपूर्तीसाठी रु. ३०७०.८९ कोटी मंजूर तरतूद होती. त्यापैकी रु. २५३२.७० कोटी इतका खर्च झालेला आहे.

(३), (४) व (५) अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी आश्रमशाळांचे अनुदान व वसतीगृह आदि कामांसाठी तरतूद केल्यानुसार अनुसूचित जातीच्या घटकांच्या लाभार्थ्यांवर खर्च करण्यात येतो.

---

**मराठवाड्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क दुष्कामुळे माफ करण्याबाबत**

**(१८) ६३११५ (२०-०८-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यात दुष्काळामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क माफ करण्यात आले असताना मागासवर्गीय विद्यार्थ्यांना परिक्षा शुल्क भरावे लागत असल्याचा प्रकार स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात होत असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पहिले परिक्षा शुल्क भरा, त्यानंतर तुमच्या शिष्यवृत्तीसोबत पैसे परत मिळतील असा आदेश समाजकल्याण विभागाने काढला, त्यामुळे विद्यार्थी अडचणीत सापडले असल्याने याबाबत चौकशी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशीच्या अनुषंगाने समाज कल्याण विभागाच्या उक्त आदेशाबाबत पुनर्विचार करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-०७-२०१७) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विद्यार्थीनीना मेट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना लाभ मिळत नाही व पूर्वी मिळालेला लाभ परत घेण्याची कार्यवाही थांबविण्याबाबत**

**(१९) ६३८६३ (२०-०८-२०१६). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ए.एन.एम./जी.एन.एम. या नर्सिंग अभ्यासक्रमासाठी ओबीसी /व्हीजेएनटी व एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थीनीना मेट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना लाभ मिळत नाही व पूर्वी लाभ मिळालेला परत घेण्याची कार्यवाही थांबविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २३ जून, २०१६ रोजी मा.सामाजीक न्याय मंत्री, म.रा. यांना लेखी निवेदन देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाचे कारण काय ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-०७-२०१७) :**(१) होय.

(२) केंद्र शासनाच्या १९९८ च्या मार्गदर्शक सुचनांनुसार ए.एन.एम./जी.एन.एम. अभ्यासक्रमासाठी विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ अनुज्ञेय नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मागासवर्गीयांसाठी राबविण्यात येणा-या रमाई घरकूल योजनेविषयी गावनिहाय लाभार्थी याद्या देणेबाबत**

**(२०) ६६६६१ (१०-०१-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागासवर्गीयांसाठी शासनाच्या वतीने राबविण्यात येणा-या रमाई घरकूल योजनेविषयी गावनिहाय लाभार्थी याद्या मागविल्या , परंतु जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा डीडीआरकडे याविषयी माहिती नसल्याचे कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०१-०७-२०१७) :** (१)नाही.

अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद , कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३०/१२/२०१६ रोजीच्या बैठकीत रमाई घरकुलच्या २१० परिपूर्ण प्रस्तावाना मंजुरी देण्यात आली आहे. व दिनांक १०/०१/२०१७ रोजीच्या बैठकीत १२४९

परीपून प्रस्तावना मंजुरी देण्यात आली आहे .आशा एकूण १४५९ प्रस्तावना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे .उर्वरित प्रस्तावांची छाननी करून मंजुरी देण्याची कारवाई चालू आहे .
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अनूसूचित जातीच्या केंद्रीय आश्रमशाळांना अनुदान न मिळाल्याबाबत**

**(२१) ६७६४४ (१०-०१-२०१७). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनुसूचित जाती-जमातींच्या मुला-मुलींसाठी सुरु केलेल्या २८८ आश्रमशाळांचे अनुदान गेल्या तीन वर्षापासून न मिळाल्यामुळे आश्रमशाळांतील विद्यार्थी, कर्मचारी अर्थाजनासाठी मिळेल ते काम करत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे केंद्रचालक कर्जबाजारी झाले आहेत तसेच शिक्षक बिनपगारी काम करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने निर्णय घेऊन सदर आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-०७-२०१७) :** (१) व (२) केंद्र पुरस्कृत आश्रम शाळेची योजना ही सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय भारत सरकार यांची असून अनुसूचित जातीच्या मुलामुलींकरिता निवासी / अनिवासी प्राथमिक माध्यमिक आश्रमशाळांना या योजनेंतर्गत केंद्रशासनाकडून ९० टक्के व स्वयंसेवी संस्थेचा १० टक्के हिस्सा या सूत्रानुसार सहायक अनुदान दिले जाते. या योजनेंतर्गत सुमारे ३२२ आश्रमशाळांना राज्य शासनाची कायम विना अनुदान तत्त्वावर मान्यता देण्यात येऊन त्यांचे प्रस्ताव केंद्र शासनास शिफारस करण्यात आले होते. तथापि, राज्याकडून मोठ्या प्रमाणात प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यात आल्याने निधी उपलब्धतेनुसार यांपैकी फक्त ३४ आश्रमशाळांना केंद्र शासनाकडून अनुदान देण्यात येत आहे.उर्वरीत आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत केंद्र शासनाकडून कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(३) सदर आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिखलदरा तालुक्यातील (जि. अमरावती) त्रिमुर्ती बहुउददेशीय संस्थेद्वारे चालविण्यात येणाऱ्या चुर्णी येथील श्रीकृष्ण वसतिगृहातील गैरव्यवहाराबाबत**

**(२२) ६८४०७ (१०-०१-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखलदरा तालुक्यातील (जि. अमरावती) त्रिमुर्ती बहुउददेशीय संस्थेद्वारे चालविण्यात येणाऱ्या चुर्णी येथील श्रीकृष्ण वसतिगृहातील संस्थाचालकाने गाई-म्हशी चारायला लावणे, शेण काढणे, आटा चक्की चालवणे, इत्यादी सह घरगुती कामे सांगून कर्मचाऱ्यांना त्रास देत असल्याचे माहे ऑगस्ट,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही कामे करण्यास कर्मचाऱ्यांनी विरोध दर्शविला त्यामुळे त्यांचे वेतन गेल्या १८ महिन्यापासून झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या वसतीगृहामध्ये एकूण पटावर ७८ विद्यार्थी दाखविण्यात आले असून येथे फक्त १२ विद्यार्थी आहेत व उर्वरित विदयार्थ्यांच्या नावावर संस्थाचालक शासनाची फसवणूक करून पैसे घेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधित संस्थेच्या संचालकावर कार्यवाही करणे तसेच कर्मचाऱ्यांचे प्रलंबित पगार मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (०४-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय. तथापि, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जि.प. अमरावती कार्यालयाने संस्थेस दिलेल्या सूचनांनुसार वसतिगृह अधिक्षक वगळता इतर कर्मचा-यांचे प्रलंबित मानधन देयक माहे ऑगस्ट २०१६ मध्ये अदा करण्यात आले आहे.
(३) व (४) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जि.प. अमरावती कार्यालयाने वेळोवेळी केलेल्या तपासणीमध्ये वसतिगृहाची विद्यार्थी पटसंख्या वारंवार कमी आढळून आलेली आहे. याबाबत, संस्थेस खुलासा करण्याचे आदेश देण्यात आले असता संस्थेने खुलासा सादर न करता वसतिगृह अधिक्षकाने कामगार न्यायालयात याचिका दाखल केली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने संस्थेस सन २०१५-१६ पासून अनुदान अदा करण्यात आलेले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अण्णा भाऊ साठे महामंडळास शासन खंड हमी १०० कोटी मंजूर करणेबाबत**

**(२३) ७१६८० (१०-०१-२०१७). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.स. ३३२ (19)

(१) राज्याभतील मातंग समाज व तत्सम १२ पोट जातीतील लोकांच्या उन्नतीसाठी कर्जाच्या स्वरुपात मदत केली जाते, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, अण्णा भाऊ साठे महामंडळास राष्ट्रीय वित्तीय योजना राबविण्यायसाठी खंड हमीची रक्कम ८२.९८ कोटी रु. प्राप्त झाली असताना ती रक्कम सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये महामंडळाकडे सादर झालेले ८७.३५ कोटी रु. प्रस्ताव अद्याप मंजूरी अभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासन खंड हमीचे १०० कोटी अण्णा भाऊ साठे महामंडळासाठी मंजूर करावे यासाठी माहे जूलै, २०१६ दरम्यान स्थायनिक लोकप्रतिनिधीने मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय.

**श्री. राजकुमार बडोले (०४-०७-२०१७)** :(१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.शाहमी-२०१२/सान्यावि/प्र.क्र.६७/अर्थबळ, दि.०६.१२.२०१४ अन्वये साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळास रु.६०.५० कोटी रुपयांची शासन हमी मंजूर करण्यात आली होती. सदर शासन हमीच्या अनुषंगाने सामाजिक न्याय व वित्त विभागाच्या उप सचिवांच्या एकत्रित स्वाक्षरीने, राष्ट्रीय महामंडळास सादर करावयाच्या करारपत्रात वित्त विभागाने वेळेवेळी सुचविलेल्या सुधारणांसह वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. सदर करारपत्र वित्त विभागाच्या मान्यतेअभावी राष्ट्रीय महामंडळ, नवी दिल्ली यांना सादर न झाल्याने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळास राष्ट्रीय महामंडळाकडून निधी प्राप्त झालेला नाही. दरम्यानच्या कालावधीत दि.०६.१२.२०१४ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या हमीची एक वर्षाची मुदत संपुष्टात आल्याने सदरहू मुदतवाढ करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता, सामाजिक न्याय विभागांतर्गत असलेल्या ५ महामंडळांचा वार्षिक ताळेबंद व महामंडळाकडे उपलब्ध असलेल्या निधीचा वापर कशाप्रकारे करण्यात येतो याबाबत विभाग स्तरावर छाननी करावी. तद्नंतर हमीस मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव फेर सादर करावा, असे अभिप्राय वित्त विभागाने दिले आहेत. त्यानुसार विभागामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अंध शाळा नोव्हेबर अखेरपर्यत बंद करण्याचे आदेश अपंग कल्याण आयुक्त पुणे यांनी दिल्याबाबत**

**(२४) ७१९६५ (२७-०१-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात एकमेव असलेली अंध शाळा नोव्हेबर अखेरपर्यत बंद करण्याचे आदेश अपंग कल्याण आयुक्त,पुणे यांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,कमी पट संख्येचे कारण देवून पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा येथील अनेक जिल्ह्यातील शाळामध्ये एक ही मूल नसताना मागील तीन वर्षापासून सदर शाळा चालू असतानाही सिंधुदुर्ग जिल्ह्यात असलेली एकमेव अंध शाळा बंद करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा येथील अनेक जिल्ह्यात एक मूल शाळा कार्यरत असून शासनाची फसवणूक करणा-या शाळांवर केलेल्या वा करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-०७-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील अंध शाळेची पटसंख्या कमी असल्याने शाळाबंद करण्यात आलेली आहे. तसेच पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ अशा कमी मुले असलेल्या व शैक्षणिक गुणवत्ता नसलेल्या शाळांना अशाप्रकारे बंद करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धारावी (मुंबई) येथे सामाजिक न्यायभवन बांधण्याबाबत**

**(२५) ७३०३१ (१०-०१-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारावी (मुंबई) येथे सामाजिक न्यायभवन बांधण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तसेच नागरिकांनी संबंधितांकडे वारंवार मागणी करूनही अद्यापी सामाजिक न्याय भवन बांधण्यात आले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धारावी येथील बस डेपोजवळ २००० चौ.मी. असलेल्या मोकळ्या जागेवर सामाजिक न्याय भवन बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०१-०७-२०१७) :** (१) होय.

(२) धारावी येथील बस डेपो जवळ २००० चौ मी मोकळ्या जागेवर सामाजिक न्याय भवन बांधण्यासाठी सदर जागेची मागणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे करण्यात

आली होती. परंतु, सदर जमीन प्राधिकरणाच्या मालकीची असून प्राधिकरणाच्या प्रकल्पासाठी आवश्यक असल्याने भूमी व मिळकत व्यवस्थापक, भूमी व मिळकत शाखा /मुं .म.प्र.वि .प्रा .यांनी त्यांच्या दिनांक २५/७/२०१६ च्या पत्रान्वये सहहायक आयुक्त, समाज कल्याण,मुंबई शहर यांना कळवले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात विशेष आर्थिक क्षेत्रासाठी (सेझ) शेतकऱ्यांकडून संपादीत केलेल्या जमिनी विनावापर पडून असल्याबाबत**

**(२६) ७४३८१ (२१-०४-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उद्‌योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेष आर्थिक क्षेत्रासाठी (सेझ) शासनाने संपादीत केलेल्या जमिनी विनावापर पडून असल्याचे माहे जानेवारी,२०१७ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात शासनाने विशेष आर्थिक क्षेत्रासाठी (सेझ) संपादीत केलेली जमिनी किती आहेत,

(३) तसेच त्यांचा वापर व्हावा म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०४-०७-२०१७) :** (१), (२) व (३) राज्यामध्ये राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान पुणे, केसूर्डी, फलटण सातारा, कृष्णूर औद्‌योगिक क्षेत्र, शेंद्रा पंचतारांकित औद्‌योगिक क्षेत्र तसेच खेड विशेष आर्थिक क्षेत्र कार्यान्वित करण्यात आलेले आहेत.

राज्यात विशेष आर्थिक क्षेत्रासाठी महामंडळामार्फत १२९३०.९३ हे.आर इतके क्षेत्र संपादीत करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे

ज्या औद्‌योगिक क्षेत्रामध्ये विशेष आर्थिक क्षेत्र स्थापित करण्यात आले आहे. परंतु भूखंडाबाबत उद्‌योजकांची मागणी प्राप्त होत नसल्यामुळे किंवा विकासकांनी विशेष आर्थिक क्षेत्र विकासीत केलेले नाहीत. अशी महामंडळाच्या जागेवरील विशेष आर्थिक क्षेत्र ना-अधिसूचित करण्यासाठी केंद्र शासनास ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे. त्यामुळे सदर विशेष आर्थिक क्षेत्र ना - अधिसूचित करण्यास केंद्र शासनाने परवानगी दिल्यानंतर त्या क्षेत्राचा वापर औद्‌योगिक प्रयोजनासाठी करण्यात येणार आहे त्यामुळे राज्यात गुंतवणूक होऊन रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्रात उद्योगांची गुणवत्ता कमी झाली असल्याबाबत

**(२७) ७४८०३ (२१-०४-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय उद्योग व वाणिज्य मंत्रालयाच्या अखत्यारितील औद्योगिक धोरण व प्रोत्साहन विभागाने (डीआयपीपी) दिनांक १ नोव्हेंबर, २०१६ रोजी प्रसिध्द केलेल्या उद्योग व्यवसाय सुधारणा कृती निर्देशांकामध्ये (इझ ऑफ डुइंग) बिझनेस इंडेक्स) महाराष्ट्राची गुणवत्ता यादीतील आठ क्रमांकावरुन दहाव्या क्रमांकावर घसरण झाल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑनलाईनद्वारे, एक खिडकीद्वारे बांधकाम परवाने देण्यापासून ते जिल्हा न्यायलयीन समन्स व न्यायालयाचे निवाडे ऑनलाईन करण्यात अपयश आले असून यासारख्या २४ मानकांमधील पिछाडी, महाराष्ट्राला मानाचे स्थान मिळवून देऊ शकली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत त्यानुसार उद्योगाची गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने विभागाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई (०६-०७-२०१७) :** (१) केंद्र सरकारच्या औद्योगिक व प्रोत्साहन विभागाने (DIPP) Ease of Doing Business-२०१६ अंतर्गत जाहीर केलेल्या यादीप्रमाणे महाराष्ट्राचा गुणवत्ता क्रमांक १० आहे.

तथापि, असे असले तरी सन २०१५ मध्ये DIPP ने सुचविलेल्या सुधारणांची पुर्तता करण्याची महाराष्ट्र राज्याची टक्केवारी ४९.४०% इतकी होती. महाराष्ट्राचा यावेळी गुणवत्ता क्रमांक ०८ होता. परंतु सन २०१६ मध्ये महाराष्ट्र राज्याने विविध सुधारणांची पुर्तता करण्यात विशेष मेहनत घेऊन त्यात आघाडी घेतली. उदा.विविध विभागांसाठी एकत्रित निरिक्षण /तपासणी पध्दत, कर नोंदणी प्रमाणपत्र एका दिवसात देणे, कामगार कायदयाविषयी १८ मुद्यांची पुर्तता, ४४ परवान्यांसाठी सिंगल विन्डो ॲप्लीकेशन पध्दतीचा वापर इत्यादी.

याचा सकारात्मक परिणाम दिसून आला आणि सन २०१६ मध्ये सुधारणांची पुर्तता करण्याबाबत महाराष्ट्र राज्याची टक्केवारी ९२.८६ % इतकी झाली. त्यामुळे यावेळी राज्याचा गुणवत्ता क्रमांक जरी १० वर राहिला तरी २०१५ मध्ये “Acceleration Required” या कॅटेगरीमध्ये असलेला महाराष्ट्र सन २०१६ मध्ये “Leaders Category” मध्ये गणला जात आहे. प्रथम १० प्रगत राज्यांच्या या संदर्भातील टक्केवारीमध्ये खुपच कमी फरक (Minimam Difference) दिसून येतो.

(२), (३) व (४) विविध विभागांच्या परवाने/नोंदणी याकरिता करावे लागणारे अर्ज ८० टक्क्यापर्यंत ऑनलाईन पध्दतीने स्विकारले जात आहेत. महाराष्ट्र राज्याच्या आपले सरकार पोर्टलव्दारे न्यायिक निवाडयाबाबत सेवा (G to B) उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

EODB-२०१६ अंतर्गत विविध विभागांनी करावयाच्या सुधारणासंबंधी केंद्र शासनाने एकूण ३४० मुद्ये दिले होते. सदर मुद्यांपैकी ३२५ इतक्या मुद्यांबाबत आवश्यक कार्यवाही /पूर्तता करण्यात आली. केंद्र शासनाने ३२५ मुद्यांपैकी ३१२ मुद्ये स्विकृत केले. काही मुद्यांबाबत पूर्ततेच्या अनुषंगाने अंतर्गत तांत्रिक बाबी उदा. ऑनलाईन प्रक्रिया, उपलब्ध डेटाचे संगणकीकरण व जोडणी, तसेच काही मुद्ये एकापेक्षा अधिक विभागांशी संबंधित असल्याने विविध प्रक्रिये अंतर्गत लागणारा कालावधी पुरेसा उपलब्ध नसल्याने काही मुद्यांची पुर्तता होवू शकली नाही. परिणामी काही अंशी गुण कमी पडल्याने राज्याची पुर्तता ९२.८६% राहीली व पर्यायाने महाराष्ट्राचा गुणवत्ता क्रमांक १० वर राहिला.

राज्य शासनाने सदर बाबीची गांभीर्याने नोंद घेवून EODB-२०१७ साठी विविध उपाययोजना, ऑनलाईन प्रक्रिया, तांत्रिक बाबींची पुर्तता इत्यादीबाबत निश्चितपणे ठोस कार्यवाही सुरु केलेली आहे. या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री व मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली विविधी विभागांतर्गत समन्वय बैठका व आढावा नियमितपणे घेण्यात येत आहे. तसेच याबाबत केंद्र शासनाशी वेळोवेळी समन्वय साधून माहितीचे आदान-प्रदान करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील लोखंड व कोळसा उत्खननासाठी खनिकर्म विभागाने विविध ३२ कंपन्यांना परवानगी देणेबाबत**

**(२८) ७५३१४ (०६-०५-२०१७). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात लोखंड व कोळसा याचे मुबलक प्रमाण असून त्याच्या उत्खननाकरीता खणिकर्म विभागाने एटापल्ली, कोरची व अहेरी या तीन तालुक्यात सुमारे ४ ते ५ हेक्टर मध्ये ३२ विविध कंपन्यांना परवानगी देणेबाबत शासनाकडे शिफारस केली असल्याची बाब ४ डिसेंबर,२०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यातील ८० टक्के भूभाग जंगल व्याप्त असून राज्यातील प्रचलित वन कायद्याने अनेक विकासाचे व सिंचनाचे प्रकल्प अद्यापी वन व पर्यावरण विभागाच्या हरकतींमुळे रद्द केलेले किंवा अपूर्ण अवस्थेत वर्षानुवर्षे पडून आहेत,हे खरे आहे काय,

(३) असल्यास, खणिकर्म विभागाने या जिल्ह्यात ३२ खाजगी कंपन्यांना कोळसा व लोखंड उत्पादन करण्याकरीता राज्य शासनाला केलेल्या शिफारशीस, राज्य शासन मान्यता देणार आहे काय,

(४) असल्यास, या ३२ कंपन्यांमुळे सुमारे ४ ते ५ हजार हेक्टर मधील वनसंपदा साग व बांबू उत्पादनावर होणारा परिणाम तसेच वन व पर्यावरणाचे होणारे नुकसान याबाबतचा अभ्यास शासनाने केला आहे काय,

(५) तसेच या ३२ खाजगी कंपन्यांना कोळसा व लोखंड उत्पादनाकरीता शासन परवानगी देणार असेल तर गेल्या अनेक वर्षापासून विविध विकास प्रकल्प व सिंचन प्रकल्पांना ही मान्यता भविष्यात देण्यात येणार आहे काय,
(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई (२०-०६-२०१७) :** (१) नाही, खाण व खनिजे (विकसन व विनियमन) सुधारित अधिनियम २०१५ च्या कलम १०-अ २ (क) च्या तरतूदी प्रमाणे ज्या ५ खाणपट्टयांना हेतू पत्र देण्यात आले होते अशा प्रकरणी दिनांक १२/०१/२०१७ पर्यंत हेतूपत्रातील पर्यावरण, वन विभागाच्या नाहरकती व खाणकाम योजनेला मंजूरी या अटींची पूर्तता करण्याची मुदत देण्यात आली होती. सदर अटींची पूर्तता न केल्याने गडचिरोली जिल्हयातील २ खाणपट्टे रद्द करण्यात आले व इतर प्रकरणे उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहेत.
(२) होय, गडचिरोली जिल्हयातील भुभाग वन जमिनी खाली मोठया प्रमाणावर आहे. वन व पर्यावरण विभागांच्या ना-हरकती शिवाय खाणकाम करण्यास मर्यादा आहेत.
(३) केंद्रीय खनिकर्म मंत्रालयाने वेळोवेळी दिलेले निदेश व खाण व खनिजे (विकसन व विनियमन) सुधारित अधिनियम २०१५ च्या तरतूदी प्रमाणे खाणपट्टा मंजूरी बाबत निर्णय प्रक्रिया अवलंबविण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिर्डी (जि.अहमदनगर) येथे मोठ्या प्रमाणात बालके व्यसनाधिन झाल्याबाबत

**(२९) ७६७१७ (०६-०५-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिडी (जि.अहमदनगर) येथे मोठ्या प्रमाणात बालके व्यसनाधिन असल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शिर्डी शहरात बालके व्यवसनाधिन बनू नयेत म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२९-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरामध्ये शेतकऱ्यांसाठी शेतकरी निवास बांधण्याबाबत**

**(३०) ७७७११ (२१-०४-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील साखर कारखान्यांच्या निधीमधून पुणे येथे साखर संकुल नजिक उभारण्यात येणारा शेतकरी निवास प्रकल्प पूर्णत: रद्द करण्यात आल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास जाहीर करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरामध्ये शेतकऱ्यांसाठी कृषी उत्पन्न बाजार समितीसह, साखर संकुल व अन्य ठिकाणी कोठेही शेतकरी निवास नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे शहरामध्ये शेतकऱ्यांसाठी शेतकरी निवास बांधण्याबाबत सहकार विभागाने कुठलाही प्रस्ताव अद्याप तयार केला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देशमुख (०७-०७-२०१७) :** (१) अंशतः खरे आहे

(२) हे खरे नाही. कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणे येथे शेतकऱ्यांसाठी निवासाची सुविधा आहे.

(३) व (४) साखर संकुल प्रकल्पांतर्गत शेतकरी निवासाचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित होते. सदर बांधकामासाठी जानेवारी २००६ मध्ये निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. निविदेत तसेच त्यानंतरच्या फेरनिविदेत कमी दर प्राप्त झाल्यामुळे संभाव्य शेतकरी निवासाचे बांधकाम स्थगित करण्यात आले. तद्नंतर कृषि विभागाकडून अद्याप हस्तांतरित न झालेली २.०३ एकर जागा या प्रयोजनासाठी उपलब्ध करून देण्याबाबत तसेच शेतकरी निवासाचे इमारतीचे बांधकाम B.O.T. तत्वावर करण्याचे प्रस्तावित होते. तथापि तद्नंतर कृषि विभागाकडून हस्तांतरित न झालेल्या २.०३ एकर जागेची कृषि विभागास आवश्यकता असल्याने ही जागा साखर आयुक्तालयाला हस्तांतरित करणे शक्य नसल्याचा निर्णय झाला. दरम्यानच्या कालावधीत काही कारखान्यांनी शेतकरी निवासासाठी जमा केलेली रक्कम परत करण्याची मागणी केल्यामुळे मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली मा. मंत्री समितीच्या दि.०३.१०.२०१६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ज्या कारखान्यांनी शेतकरी निवासासाठी रक्कम जमा केलेली आहे ती एकूण मुद्दल रक्कम कारखान्यांना परत करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरुर तालुक्यातील सुमारे १८ हजार शेतकऱ्यांची व्यंकटेश कृपा साखर कारखान्याकडे सभासद करुन घेणेबाबतची मागणी**

**(३१) ७७७८७ (२१-०४-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जातेगाव बु.(ता.शिरुर,जि.पुणे) येथील व्यंकटेश कृपा साखर कारखान्याच्या सर्व व्यवहारांची चौकशी करण्याची मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीसह ५० शेतकऱ्यांनी स्वतंत्र अर्जाने सिक्युरीटी एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०११ मध्ये व्यंकटेश कृपा कारखान्याने शेअर्सपोटी १० हजार रुपये घेवून शेअर्स न देता ते सुरक्षा ठेव म्हणून ठेवून घेतले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिरुर तालुक्यातील सुमारे १८ हजार शेतकऱ्यांची व्यंकटेश कृपा साखर कारखान्याकडे त्यांना सभासद करुन घ्या अशी मागणी असूनही अद्याप कारखान्याने एकाही शेतकऱ्याला सभासद केले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०७-०७-२०१७) :** (१) ते ५) व्यंकटेश कृपा हा सहकारी साखर कारखाना नसून खाजगी साखर कारखाना आहे. हा साखर कारखाना कंपनी कायद्यांतर्गत नोंदणीकृत साखर कारखाना आहे. या कारखान्याच्या व्यवहारांची चौकशी करण्याची बाब राज्य शासनाच्या अधिकार क्षेत्रात येत नाही.

---

**राज्यातील ज्येष्ठ नागरिकांबाबत धोरण तयार करणेबाबत**

**(३२) ७८५२५ (२१-०४-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एकूण लोकसंख्येच्या २० टक्के ज्येष्ठ नागरिकांची संख्या असून आयुष्याच्या अखेरीस किमान सुविधा, संरक्षण मिळावे अशी त्यांची माफक अपेक्षा असतांनाही शासनाने त्यांच्याकरिता कोणतेही ठोस धोरण तयार केले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोफत औषधोपचार, दरमहा पाच हजार रूपये पेंशन, सक्षम ज्येष्ठांना रोजगार, एसटीत दोन ऐवजी पाच जागांवर आरक्षण, तालुका पातळीवर विरंगुळा केंद्र, सक्षम रूग्णालये, स्वतंत्र मंत्रालय अशा मागण्या आहेत हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (३०-०६-२०१७) :**(१) खरे नाही.

(२) नाही.

(३) सामाजिक न्याय विभागामार्फत ज्येष्ठ नागरिकांकरिता सर्वसाधारण वृध्दाश्रम, मातोश्री वृध्दाश्रम, ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्र देणे, ज्येष्ठ नागरिकांना एस.टी. भाड्यात ५०% सवलत, संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना व इंदिरा गांधी वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना या योजना राबविण्यात येतात.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**राज्यात सामाजिक न्याय विभागातर्फे ॲट्रॉसिटी कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करण्याबाबत**

**(३३) ७८६३१ (२१-०४-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या सामाजिक न्याय विभागाने ॲट्रॅसिटी या कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले असल्याचे माहे डिसेंबर,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी प्रत्येक उपविभागीय अधिकारी पातळीवर एडीओ दक्षता व नियंत्रण समिती स्थापन करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या समित्यांवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती करताना प्रत्यक्ष दलित, आदिवासीमध्ये काम करणा-या व्यक्तींना घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (३०-०६-२०१७) :** (१) होय.

(२) होय.

(३) या समितीमध्ये अनुसूचित जाती जमातीच्या अशासकीय संस्थांच्या सामाजिक कार्यकर्त्यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यात विविध आर्थिक विकास महामंडळांना निधी उपलब्ध होऊनही कामकाज अद्याप सुरू झाले नसल्याबाबत**

**(३४) ७८७०९ (२१-०४-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरासह जिल्ह्यात मागासवर्गीय घटकातील बेरोजगारांना स्वयंरोजागारासाठी सुलभ व्याजदराने अर्थसहाय मिळवून देणा-या विविध आर्थिक विकास महामंडळांना शासनामार्फत कोट्यावधी रूपयांचा निधी उपलब्ध होऊनही महामंडळाचे कामकाज अद्याप सुरू झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळांसह इतर महामंडळाना अनुदान प्राप्त झाले असतानाही विविध योजना बंद आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) तसेच त्यानुषंगाने या संदर्भात महामंडळातील विविध योजना पूर्ववत सुरू करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-०७-२०१७) :** (१) नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दि महाराष्ट्र स्टेट कॉ-ऑप. हाऊसिंग फायनान्स महामंडळ आर्थिक अडचणीत सापडल्याबाबत**

**(३५) ७८९६३ (२१-०४-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व सामान्य जनतेला गृहकर्ज उपलब्ध व्हावे यासाठी राज्य शासनाने सन १९६० मध्ये स्थापन केलेले दि महाराष्ट्र स्टेट कॉ-ऑप. हाऊसिंग फायनान्स महामंडळ सद्य:स्थितीत आर्थिक अडचणीत सापडले असल्याची बाब माहे फेब्रुवारी,२०१७ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदशर्नास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने वित्तीय पुरवठा करण्यासाठी हमी देण्याचे बंद केल्याने आणि संचालकांचे सदोष कामकाज यामुळे सदर महामंडळ आर्थिक अडचणीत आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मंडळाच्या संचालक मंडळाने केलेल्या आर्थिक व्यवहारांची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय;

(४) असल्यास, सदर चौकशीत काय आढळून आले आहे आणि सदरहू महामंडळाचा कारभार सुरळीत चालवा यासाठी महामंडळास भाग भांडवल उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देशमुख (२८-०६-२०१७)** :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) कॉर्पोरेशनच्या मालकीच्या बांद्रा-कुर्ला संकुलातील जागा भाडयाने देणे संदर्भात झालेल्या चुकीच्या करारपध्दतीमुळे नुकसान झाले असून त्याबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी सुरु आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पेंडगाव, आमठाणा (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) येथील सावकारांच्या घर व दुकानावर छापे मारुन तब्बल ३२ शेतजमिनीच्या खरेदीखतासह, करारनामे व इतर दस्ताऐवज जप्त केले असल्याबाबत**

**(३६) ७९६२७ (२१-०४-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिल्लोड तालुक्यातील (जि.औरंगाबाद) पेंडगाव, आमठाणा येथील काशीनाथ गंगाधर काटेकर या सावकारांच्या घर व दुकानावर एकाचवेळी सिल्लोड येथील सहाय्यक निबंधकांनी छापे मारुन तब्बल ३२ शेतजमिनीच्या खरेदीखतासह, करारनामे व इतर दस्ताऐवज जप्त केले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सावकाराने अवैध सावकारी करुन अनेक शेतक-यांना व्याजाने पैसे देऊन त्यांच्या जमिनी घेतल्या असल्याच्या तक्रारी आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर सावकारांवर कारवाई करुन त्यांच्याकडील शेतक-यांच्या जमिनी त्यांना परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०५-०७-२०१७)** : (१) होय.
(२) होय.
(३) सदर अवैध सावकारी प्रकरणी एकूण ८ तक्रारी प्राप्त झाल्या असुन सर्व तक्रारी या शेतजमीनीच्या संबंधाने आहेत. सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील तरतुदीनुसार चौकशीची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील औद्योगिक वसाहतीत उद्योगधंद्यासाठी नाममात्र १% व्याजदराने कर्ज पुरवठा करण्याबाबत

**(३७) ७९७५९ (२१-०४-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक विकासाच्या दृष्टीने संबंधित औद्योगिक वसाहतीत उद्योगधंद्यासाठी नाममात्र १% व्याजदराने कर्ज पुरवठा करण्यात यावा या मागणी संबंधित जिल्ह्याच्या औद्योगिक वसाहतीतील लाभधारक,त्यांच्या संघटना जनप्रतिनिधी यांनी संबंधित जिल्हा औद्योगिकक्षेत्राच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच मा.मंत्री(उद्योग), तसेच प्रधान सचिव (उद्योग) आणि जिल्हा उद्योग अधिकारी यांच्याकडे माहे डिसेंबर,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्नोक्त बाब (१) च्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्याचे प्रस्तावित केले आहे,

(३) असल्यास, माहे जानेवारी, २०१७ अखेरपर्यंत किती जिल्हा प्रशासनाकडून या संदर्भातील प्रस्ताव शासनास प्राप्त झाले आहे व त्यापैकी किती प्रस्तावास तत्वतः मंजुरी प्रत्यार्पित करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. सुभाष देसाई (०३-०७-२०१७) :**(१) खरे नाही.

(२) लागू नाही.

(३) लागू नाही.

(४) लागू नाही.

---

## वेकोली माजरीच्या कुनाड कोळसा खाणीत खाजगी डेको कंपनीचे वाहन भरधाव जात असतांना झालेल्या अपघातात दोन कामगारांचा मृत्यू झाल्याबाबत

**(३८) ८००२२ (०६-०५-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेकोली माजरीच्या कुनाड कोळसा खाणीत खाजगी डेको कंपनीचे वाहन भरधाव जात असताना झालेल्या अपघातात दिनांक १८ जानेवारा,२०१७ रोजी वा त्या सुमारास दोन कामगारांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२०-०६-२०१७)** : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विशेषत: मुंबई, नाशिक जिल्ह्यातील तालुका उपनिबंधकाकडून अंतिम आदेश येऊनही गृहनिर्माण सहकारी संस्थांनी लेखा परीक्षण केले नसल्याबाबत

**(३९) ८००२६ (२१-०४-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहकार कायद्याच्या नियमानुसार राज्यातील सर्वच सहकारी संस्थांनी दरवर्षी आपले वैधानिक लेखापरीक्षण पूर्ण करणे आवश्यक असतानाही मुंबईतील सुमारे ८ हजार सहकारी संस्थांनी व नाशिकमधील सुमारे ३ हजार सहकारी संस्थांनी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरीक्षण अद्यापही पूर्ण केले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदरहू चौकशीत काय आढळून आले आणि सदरहू सहकारी संस्थांचे सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरीक्षण पूर्ण होण्याकरिता शासनाकडून कोणत्या उपाययोजना हाती घेण्यात आल्या वा येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०७-२०१७)** : (१) हे खरे नाही.

मार्च २०१७ अखेर पर्यंत सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात मुंबईतील एकूण ३००३३ संस्थांपैकी एकूण २४०५६ इतक्या संस्थांचे लेखापरिक्षण पुर्ण झालेले असून उर्वरित ५९७७ संस्थांचे लेखापरिक्षण झालेले नाही. तसेच नाशिक जिल्हयातील एकूण ६९४३ संस्थांपैकी एकुण ५८६३ इतक्या संस्थांचे लेखापरिक्षण पुर्ण झालेले असून उर्वरित १०८० संस्थांचे लेखापरिक्षण झालेले नाही.

(२) ज्या जिल्हयामध्ये लेखापरिक्षण कामकाज कमी आहे, त्या जिल्हयांच्या उपनिबंधकांना व जिल्हा विशेष लेखापरिक्षकांना १००% लेखापरिक्षण पूर्ण करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) ज्या लेखापरिक्षाकांनी लेखापरिक्षण पुर्ण करुन अहवाल सादर केलेले नाहीत, त्या लेखापरिक्षकांची नांवे राज्याच्या नामतालिकेवरुन कमी करणेबाबतचे प्रस्ताव सादर करणेबाबत सहकार आयुक्त, पुणे यांनी क्षेत्रिय अधिकाऱ्यांना कळविले आहे. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील तरतूदीनुसार ज्या संस्थांनी लेखापरिक्षाकंची नेमणूक तसेच मागील वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षा अहवाल इत्यादीचे अनुपालन केलेले नाही, त्यांचेविरुध्द कायद्यानुसार कारवाई करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरिक्षक यांना सहकार आयुक्त, पुणे यांनी निर्देश दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलडाणा जिल्ह्यातील शासकीय मुला मुलींचे वस्तीगृहासाठी जागा उपलब्ध नसल्याबाबत**

**(४०) ८०८९० (२१-०४-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्ह्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय मुला मुलींचे वस्तीगृहासाठी चिखली, देऊळगांव राजा, नांदुरा, खामगांव, शेगाव, मोताळा, बुलडाणा मलकापूर, या तालुक्याच्या ठिकाणी जागा उपलब्ध नसल्याचे माहे जानेवारी,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,जागेअभावी विद्यार्थ्यांना मिळणा-या सुविधापासून वंचित रहावे लागत असून नविन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थांना प्रवेश मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वस्तीगृहांना जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (३०-०६-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही. सदरील वसतिगृहांसाठी भाड्याने इमारती घेण्यात आलेल्या आहेत. संबंधित वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना नियमानुसार वसतिगृहाचे प्रवेश क्षमतेनुसार प्रवेश देण्यात आलेला आहे. तसेच त्यांना नियमानुसार सोयी-सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

(३) शासकीय / खाजगी जमीन घेण्यासाठी कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगांव (जि.बुलढाणा) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यास स्वयंपाकी महिलेने मारल्याबाबत**

**(४१) ८१४४४ (२४-०४-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह,चांदमारी मधील विद्यार्थ्याने जेवणातील मेनू आणि दर्जाबद्दल विचारणा केल्यामुळे स्वयंपाकी महिलेने त्या विद्यार्थ्यास मारल्याची घटना माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास,चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (३०-०६-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, याबाबत चौकशी करण्यात आलेली आहे. तसेच सदर प्रकरणाबाबत मा. प्रबंधक, मानवी हक्क आयोग, मुंबई यांच्या कार्यालयामध्ये सुनावणी घेण्यात आलेली आहे.

(३) सद्यस्थितीत महिला स्वयंपाकीने संबंधित विद्यार्थ्यांची माफी मागितल्याने त्यांच्यातील वाद संपुष्टात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**समुद्रपूर (जि. वर्धा) तालुक्यातील सहकारी खरेदी विक्री संस्थेने १०० मजुरांचे ग्रज्युटी फंड अद्याप दिले नसल्याबाबत**

**(४२) ८१४४९ (२१-०४-२०१७). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समुद्रपूर (जि. वर्धा) तालुक्यातील सहकारी खरेदी विक्री संस्थेने १०० मजुरांचे ग्रज्युटी फंड अद्याप दिले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मजुरांचे ग्रज्युटी फंड देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२०-०६-२०१७) :**(१) व (२)

खरेदी विक्री सहकारी संस्था, समुद्रपूर या संस्थेचे जिनींग युनिट २००३ पासुन बंद आहे.या बंद युनिट मधील १६ कामगारांनी ग्रॅज्युयटी मिळावी यासाठी कामगार न्यायालय,वर्धा येथे तर २७ कामगारांनी ग्रॅज्युयटी अधिनियमांतर्गत अप्पर कामगार आयुक्त, नागपूर येथे प्रकरणे दाखल केली आहेत.सदर प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.न्यायालयाच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कनवाड (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील कनवाड ते बनवाडीपर्यंत सुमारे तीन किलोमिटर अंतरावर पक्का रस्ता करण्यात आला नसलेबाबत**

**(४३) ८१८७७ (२१-०४-२०१७). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कनवाड (ता.शिरोळ,जि. कोल्हापूर) येथील कनवाड ते बनवाडीपर्यंत सुमारे तीन किलोमिटर अंतरावर पक्का रस्ता अद्यापपर्यंत करण्यात आला नसून याबाबतची मागणी तेथील नागरिक वारंवार शासनाकडे करीत आहेत,हे खरे आहे काय,

(२) तसेच या रस्त्यावरून होणारी वाळू वाहतूक बंद करण्यात यावी असा ठराव कनवाड ग्रामसभेने करूनही जिल्हा खनिकर्म अधिका-यांच्या दूर्लक्षामुळे या रस्त्यावरून वाहतूक अद्यापही सुरू आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचा रस्ता पक्का करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहे ?

**श्री. सुभाष देसाई (२०-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे, कनवाड (ता.शिरोळ, जि. कोल्हापूर) येथील कनवाड ते बनवाडी पर्यंत सुमारे तीन किलोमीटर अंतरावर पक्का रस्ता अद्यापपर्यंत करण्यात आला नसून याबाबतची मागणी तेथील नागरिकांनी उपअभियंता सार्वजनिक (बांधकाम) पंचायत समिती शिरोळ यांचेकडे केली आहे.
(२) सदर रस्त्यावरुन होणारी वाळू वाहतूक बंद करण्यात यावी असा ठराव कनवाड ग्राम सभेने केला आहे तरी देखील या रस्त्यावरुन वाळू वाहतूक सुरु असते. परंतु सद्यस्थितीत मा.हरितन्यायाधिकरणाचे आदेशान्वये संक्शन पंपाद्वारे वाळू उपसा बंद असल्याने वाळू वाहतूक बंद आहे. सार्वजनिक रस्त्यावरुन वाळू वाहतूक बंद करणे योग्य होणार नाही. तसेच अशी वाहतूक बंद करण्याचा अधिकार जिल्हा खनिकर्म अधिकारी यांना नाही.
(३) सदरचा रस्ता पक्का करण्याकरीता मा.मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून लिंक रोड-८ मधील प्राधान्य यादी मध्ये क्रमांक -२१ मध्ये समाविष्ट असून त्याबाबतची कार्यवाही सुरु आहे असे उपअभियंता (बांधकाम) पंचायत समिती शिरोळ यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील तारापूर औद्योगिक क्षेत्रातील चिल्हार-बोईसर रस्त्याची दुरावस्था झाल्याबाबत

**(४४) ८१९५९ (२१-०४-२०१७). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील तारापूर औद्योगिक क्षेत्रातील चिल्हार-बोईसर रस्त्याची दुरावस्था झाली असून रस्त्यात मोठे खड्डे पडल्याने सदर रस्ता तातडीने दुरुस्त करावा तसेच या रस्त्याचे चौपदरीकरण करावे अशी मागणी सातत्याने स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन रस्ता दुरुस्ती करण्याबाबत व रुंदीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७)** : (१) होय, हे खरे आहे.

माहे जून-२०१६ व ऑगस्ट-२०१६ मध्ये श्रमजीवी संघटना व श्री. निलम संखे, शिवसेना शहर प्रमुख यांनी रस्ता दुरूस्तीची मागणी केली होती.

(२) व (३) चिल्हार बोईसर हा तारापूर औद्योगिक क्षेत्राला जोडणारा एकूण १६.५० कि.मी. लांबीचा दुपदरी रस्ता आहे. पावसाळयामध्ये पडलेले खड्डे वेळोवेळी खडी मुरुमाने भरुन रस्ता वाहतूकीस सुयोग्य ठेवण्यात आला होता. पावसाळा संपल्यानंतर माहे ऑक्टोबर-२०१६ अखेरीस सदर खड्डे डांबरीकरणाने दुरुस्त करुन घेण्यात आले असून त्या रस्त्यावरुन सुरळीत वाहतूक चालू आहे. सदर रस्त्यावरील वाहतुकीची वर्दळ लक्षात घेता महामंडळाने रस्त्याच्या डांबरीकरणाचे व चौपदरीकरणाचे काम हाती घेतले असून काम प्रगती पथावर आहे व सदर काम पूर्ण होण्याचा कालावधी माहे ऑगस्ट-२०१८ पर्यंत आहे. तसेच चिल्हार-बोईसर रस्त्यावर हाथ व सूर्या या दोन नद्यांवर दुपदरी पुला ऐवजी नवीन दोन चौपदरी पुलाचे बांधकाम सुरु असून ते माहे मे-२०१८ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे. सदर काम पूर्ण होण्याचा कालावधी माहे ऑगस्ट- २०१८ पर्यंत आहे.

---

## ज्येष्ठ नागरिकांसाठी अॅपची निर्मिती करण्याबाबत

**(४५) ८२१५३ (२१-०४-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.राजन साळवी (राजापूर), अॅड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घरात एकट्या राहणाऱ्या तसेच वृद्धाश्रमात राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांसाठी तयार करण्यात आलेल्या अॅप आणि वेबसाईटचे माहे जानेवारी,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान राज्य शासनाने लोकार्पण करण्याचे जाहीर केले होते, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, काही तांत्रिक अडचणींमुळे शासनाची ही योजना माहे जानेवारी,२०१७ मध्ये कार्यान्वित होवू शकलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, सदरहू योजना किती कालावधीत कार्यान्वित होणे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (३०-०६-२०१७)** :(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा वित्त विकास महामंडळाने कर्जवाटपात दिव्यांगांकडे दूर्लक्ष केल्याबाबत

**(४६) ८२२३० (०६-०५-२०१७). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपंग व्यक्तींचे पुर्नवसन करण्यासाठी शासनाने अपंग वित्त विकास महामंडळाची स्थापना केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील १२ वर्षांच्या आकडेवारीनुसार जिल्हा वित्त विकास महामंडळाकडून केवळ अस्थिव्यंगाना जास्त कर्जपुरवठा केला जात असून इतर प्रवर्गातील अपंगाना कर्जप्रकरणे मंजूर केली जात नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपंग महामंडळाकडून सर्व प्रवर्गातील अपंगाना अर्थसहाय्य करताना दुजाभाव होत असल्याने इतर प्रवर्गातील अपंगांमध्ये नाराजी आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सर्व अपंगाना अर्थसहाय्य मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-०७-२०१७) :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे. महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळामार्फत वेगवेगळया अपंगत्व प्रकारानिहाय प्रकरणे मंजूर करण्यात आलेल्या लाभार्थ्यांची यादी खालीलप्रमाणे आहेत :- अ.क्र. अपंगत्वाचा प्रकार मंजूर लाभार्थी संख्या १. अंध २,०२० २. अस्थिव्यंग १३,५६७ ३. मुकबधीर १६२ ४. मतिमंद ४८५ एकूण १६,२३४

(३) नाही.

(४) अंध, मतिमंद, मुकबधीर व मनोरुग्ण या अपंग प्रवर्गातील व्यक्तींना महामंडळाच्या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घेता यावा याकरिता कर्जावरती व्याजदर ०.५ टक्के कमी आकारण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## राज्यात इतर मागासवर्गीयांसाठी महामंडळाकडून करण्यात येणाऱ्या कर्जवाटपाबाबत

**(४७) ८२४१४ (२१-०४-२०१७). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इतर मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळामार्फत वाटप होणा-या कर्जाबाबत न्हावी समाजाच्या उन्नतीसाठी केवळ १० ते २० हजार रुपयापर्यंत कर्ज पुरवठा केला जातो. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्हावी समाजाच्या उन्नतीसाठी वाटप करण्यात येणाऱ्या कर्जाची मर्यादा २० हजार रूपये वरुन ५ ते २० लाख रुपयापर्यंत वाढविण्यात यावी यासाठी न्हावी समाजाच्या संघटनेने राज्य शासनाकडे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनने न्हावी समाजाच्या उन्नतीसाठी कर्जाची मर्यादा वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (०४-०७-२०१७) :** (१) नाही.

(२) नाही, संघटनेने अशी मागणी केल्याचे निवेदन आढळून येत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मातंग समाजाच्या आर्थिक उन्नातीसाठी स्थापन झालेल्या लोकशाहिर अण्णामभाऊ साठे मंडळाला निधी मिळणेबाबत

**(४८) ८२४४५ (२१-०४-२०१७). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मातंग समाजाच्या आर्थिक उन्नीतीसाठी स्थापन झालेल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे मंडळास आर्थिक वर्ष संपत आले तरी यावर्षाचा निधी मिळाला नाही,हे खरे आहे काय,

(२) असल्यास,यामुळे लातूर जिल्हयातील मातंग समाजाची अनेक कर्ज प्रकरणे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदरचा निधी अद्यापपर्यंत न मिळण्याची कारणे काय आहे तसेच निधी केंव्हापर्यंत प्राप्त होणारा आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (०४-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळास सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात विशेष केंद्रीय अर्थसहाय्य योजनेंतर्गत रु.१३ कोटी इतका निधी उपलब्ध आहे.

(२) हे खरे नाही, सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महमंडळामार्फत लातूर जिल्हयात एकूण ३१६ कर्ज प्रकरणांपैकी २३७ कर्ज प्रकरणे मंजूर करण्यात आलेली आहेत. उर्वरित ७९ प्रलंबित प्रकरणांपैकी २७ कर्ज प्रकरणे बँकांनी नामंजूर केलेली असून उर्वरित ५२ कर्ज प्रकरणे बँकेकडे मंजूरीअभावी प्रलंबित आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे खेर्डी (ता. चिपळूण) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची ओपन स्पेस कायदेशीर पूर्तता न करता कमर्शियल प्लॉट करून देण्यात आल्याबाबत**

**(४९) ८३९४० (२१-०४-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खेर्डी (ता.चिपळूण,जि. रत्नागिरी) येथील गुहागर-विजापूर राज्यमार्गाच्या मध्यापासून ३७ मीटरच्या आत असणारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची ओपन स्पेस पी-३१ (१२०० चैारस मीटर) ही जागा वृक्षसंवर्धनासाठी अभिप्रेत असताना कमर्शियल प्लॉट करीता देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ओपन स्पेस पी-३१ कायद्याने लिलाव पध्दतीने मूळ मालकांना नोटीस देवून करारनामा करणे गरजेचे असताना कोणतीही कायदेशीर पूर्तता न करता कमर्शियल प्लॉट करून देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ओपन स्पेस पी-३१ ची मूळ नस्ती रत्नागिरी एमआयडीसी कार्यालयातून गायब करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत उक्त प्रश्न भाग १, २, व ३ बाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले,

(५) असल्यास,याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास त्याची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) :** (१) होय. हे खरे आहे.

महामंडळाच्या खेर्डी चिपळूण औद्योगिक क्षेत्रातील १५०० चौ.मी ची मोकळी जागा, अध्यक्ष इंडीयन मिलीटरी एक्स-सर्व्हिसमेन वेलफेबअर बोर्ड यांना दि. ०३.०४.२००२ रोजी पुष्पसंवर्धन व फळसंवर्धन या प्रयोजनाकरिता देण्यात येऊन दि. २०.०६.२००२ रोजी भूखंडाचे वाटपपत्र देण्यात आले होते. तथापि भूखंड विकासाबाबत निर्धारीत वेळेत काही कार्यवाही झालेली नसल्यामुळे वाटपपत्र रद्द करण्यात येऊन भूखंडधारकास भूखंडाच्या अधिमुल्यापोटी महामंडळाकडे भरणा केलेल्या रक्कमेतून कोणतीही वजावट न करता तत्कालिन धोरणाप्रमाणे पूर्ण रक्कम परत करण्यात आली आहे. तद्‌नंतर महामंडळाचे धोरणानुसार सदर अतिरिक्त मोकळया जागेचे व्यापारी भूखंडामध्ये MMC ची मंजूरी घेऊन रुपांतर करण्यांत आलेले आहे व DCR मधील तरतूदीप्रमाणे १० टक्के ओपन स्पेस ठेवण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही. कायदेशीर बाबींची पूर्तता करुन निर्णय घेण्यात आलेला आहे.

(३) मूळ नस्ती गहाळ झाल्याने संचिकेची पुनर्बांधणी करण्यात आली आहे.

(४) व (५) ओपन स्पेस क्र. १ चे कायदेशीर बाबींची पूर्तता करुन व्यापारी भूखंडामध्ये (पी-३१) रुपांतर करण्यात आले असल्याने कार्यवाहीचा प्रश्न नाही. भूखंड क्र.पी-१ ची मूळ नस्ती प्रादेशिक कार्यालय, रत्नागिरी येथे उपलब्ध नसल्यामुळे दिनांक १६/१२/२००७ च्या स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानंतर महामंडळातील इतर विभागातील कागदपत्रे व भूखंडधारकाकडून कागदपत्रांच्या प्रती घेऊन पी-३१ च्या हरवलेल्या संचिकेची पुनर्बांधणी करण्यात आली आहे.

---

**मौजे पांगरी व भोयर(ता.जि.यवतमाळ) येथील भूसंपादन प्रकरण क्र. १/६५/९४-९५/ अति. औद्योगिक क्षेत्रापैकी लोहारा व पांगरीची अ-वर्ग नगर परिषद हद्दीजवळील अकृषक दर्जाची जमीन सक्तीने संपादीत केल्याबाबत**

**(५०) ८४०७९ (०६-०५-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे लोहारा, पांगरी व भोयर (ता.जि.यवतमाळ) येथील भूसंपादन प्रकरण क्र. १/६५/९४-९५/अति.औद्योगिक क्षेत्रापैकी लोहारा व पांगरीची अ-वर्ग नगर परिषद हद्दीजवळील अकृषक दर्जाची जमीन चूकीने व सक्तीने संपादीत केली आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीन शासनाच्या १५ वर्षाच्या जमीन वापराच्या निर्णयामुळे संपादीत केली असून ती संबंधितांना परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.

यवतमाळ जिल्हयाच्या औद्योगिक विकासाच्या दृष्टीने अस्तित्वात असलेल्या यवतमाळ औद्योगिक क्षेत्रालगतची ४३९.८५ हे.आर जागा संपादन करणे आवश्यक असल्याने औद्योगिक क्षेत्रालगतची विकासाच्या दृष्टीने सुसाध्य असलेली मौजे लोहारा, पांगरी व भोयर येथील एकूण ४३९.८५ हे. जमीन संपादित करण्यात आली आहे. सदर जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनयम १९६१ अन्वये प्रकरण ६ नुसार अधिसूचीत करण्यात आली असून कलम ३२ (१) ची अंतीम अधिसूचना दि. २८.०१.१९९६ चे शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. संपादित जमीनीचा मोबदला संबंधीत भूधारकांस वाटप करुन जमीनीचा ताबा माहे फेब्रुवारी/मार्च १९९८ मध्ये महामंडळास प्राप्त झालेला असून भूसंपादन कार्यवाही पूर्ण झालेली आहे.सदर जमिनीचा ताबा संबंधित भूधारकांनी शासनास सुपूर्द केला असून संपादीत करण्यात आलेल्या जमिनी जबरदस्तीने संपादीत केलेल्या नाहीत.

(२) जमीन संपादनाची प्रक्रीया पूर्ण झाल्यावर प्रथम टप्यात मौजे भोयर येथील जागेवर सन २००० मध्ये विकास कामास सुरवात झाली असून मौजे भोयर व लोहारा येथील साधारणपणे ९८.०० हे. आर क्षेत्र विकसीत करण्यात आले आहे. तसेच मौजे भोयर मधील उर्वरीत १३१.०० हे. आर जागेवर एकूण १४७ भूखंडांच्या आराखडयास मंजुरी प्राप्त झाली असुन एकूण ८० उद्योजकांना भूखंडाचे देकारपत्र निर्गमीत करण्यात आलेले आहे. सदर औद्योगिक क्षेत्रामध्ये

२०८.०० हे. आर जागा SEZ करीता राखीव ठेवण्यात आलेली होती. परंतु जागतिक मंदीमुळे विकासामध्ये प्रगती न झाल्याने विशेष आर्थीक क्षेत्र रदद करण्याचा निर्णय झाल्यामुळे मौजे लोहारा व पांगरी येथील जागा उद्योजकांस वाटप करण्याचे दृष्टिने मौजे लोहारा येथील जागेमधून मे. रेमंड उद्योगाकरीता एकुण १२.०५ हे. आर जागा देण्यात आली असून ९३ हे.आर जागेवर वस्त्रोद्योग झोन घोषित करण्यात आलेला आहे. उर्वरीत जागेवर नव्याने १५९ भुखंडाचा आराखडा विकसित करण्यात येत असून त्यामधील १४० भुखंडाचे वाटप उद्योजकांना झालेले आहे. त्यापैकी २९ भूखंडांचा ताबा भुखंड धारकास देण्यात आलेला असुन उर्वरीत भूखंड धारकास ताबा देण्याची कार्यवाही सुरु आहे. यास्तव औद्योगिक विकासाची प्रक्रीया सुरु असल्याने संबंधितांना जमिन परत करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.